दैनिक

जनतेचा आवाज

# लोकजागृती

स्थापना : १९८६

दि. 22/7/2026
बुधवार

- लातूर
- वर्ष : ४० वे
- अंक : १९४
- पाने : ४


## डिजिटल युगात सुरक्षिततेचा मंत्र

# देशिकेंद्र विद्यालयात सायबर सुरक्षा विषयी शहरासह ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना ज्ञान मिळणे

## काळाची गरज -- अविष्कार कांबळे, देवणी लक्ष्मण रर्णादवे



**लातूर प्रतिनिधी**

लातूर येथील राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर व क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर जिल्ह्यात 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' हा जनजागृती उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत श्री देशिकेंद्र विद्यालय, सुतमिल रोड, लातूर येथे विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले.

दि. 21 जुलै 2026 रोजी सकाळी 10.00 ते 12.00 या वेळेत पार पडलेल्या या सत्रामध्ये इयत्ता 8 वी ते 10 वी मधील 200 हून अधिक विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी सायबर वॉरियर नरेश पंडित व सायबर वॉरियर अविष्कार कांबळे यांनी विद्यार्थ्यांना फोटो मॉर्फिंग म्हणजे काय, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) च्या माध्यमातून फोटो कसे तयार केले जातात, AI चा सुरक्षित व जबाबदारीने वापर, मजबूत (Strong) पासवर्ड कसा तयार करावा याची उदाहरणांसह माहिती दिली. तसेच मोबाईलमध्ये कोणतेही ॲप डाउनलोड करताना कोणत्या परवानग्या (Permissions) द्याव्यात आणि कोणत्या परवानग्या देणे टाळावे, याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ऑनलाईन फसवणूक, बनावट लिंक, OTP फसवणूक आणि सोशल मीडियाचा सुरक्षित वापर याविषयीही महत्त्वपूर्ण माहिती देण्यात आली.

### कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

संवादात्मक पद्धतीने पार पडलेल्या या सत्रात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत विविध प्रश्न विचारले. प्रत्यक्ष उदाहरणांच्या माध्यमातून सायबर सुरक्षेचे महत्व प्रभावीपणे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आले. या कार्यक्रमासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री कोळी सर यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री दानाई सर यांनी विशेष सहकार्य केले. तसेच विद्यालयातील सर्व शिक्षकांची उपस्थिती लाभली.

या सत्राला क्विक हिल फाऊंडेशनचे फील्ड इन्स्पेक्टर अरविंद सर यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून भेट दिली व सत्राचे निरीक्षण केले.

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना सुरक्षित डिजिटल सवयी अंगीकारून जबाबदार डिजिटल नागरिक बनण्याचे आवाहन करण्यात आले.

**मजबूत पासवर्ड ठेवा**
अक्षरे, अंक आणि विशेष चिन्हांचा वापर करा.

**ॲप परवानग्या विचारपूर्वक द्या**
अनावश्यक परवानग्या देणे टाळा.

**फसवणूक टाळा**
अपरिचित लिंक, OTP कधीही कुणालाही शेअर करू नका.

**सायबर सुरक्षा**
आपली जबाबदारी, सुरक्षित डिजिटल भविष्य आपले ध्येय!

**सायबर सुरक्षा जनजागृती उपक्रम**
- राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर
- क्विक हिल फाऊंडेशन, पुणे
- सायबर शिक्षण फॉर सायबर सुरक्षा